MHNG080000622023

कि.फौ.प्र. क्र. २६/२०२३
प्रियंका विरुध्द अमोल

## <u>निशाणी क्र. ५ वर आदेश</u>

## (दिनांक १८/०६/२०२४)

यातील अर्जदार यांनी प्रस्तुतचा मुळ अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५(३) नुसार दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अंतरिम पोटगी मिळण्याची विनंती देखील अर्जदारने केलेली आहे.

**०२.** अर्जदारने असे कथन केले आहे की, अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी आहे. अर्जदाराच्या लग्नाच्यावेळी अर्जदाराच्या पालकाने ४,५०,०००/- ते ५,००,०००/- इतके रुपये खर्च केले. तसेच जिवनावश्यक वस्तु व सोन्याच्या वस्तु अर्जदार हिला दिल्या होत्या. लग्नानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराच्या घरी त्याच्या परिवारासोबत राहत होती. काही महिन्यानंतर गैरअर्जदारने अर्जदार हिचा अपमान करण्यास सुरुवात केली. कोणतेही कारण नसताना गैरअर्जदार हा अर्जदार हिला मारहाण करून तिचा अपमान करीत होता. गैरअर्जदार हा दारू पिऊन येवून अर्जदार हिला मारहाण करीत होता व शिवीगाळ करीत होता. त्यामुळे अर्जदार हिला मानसीक व शारिरीक त्रास होवू लागला. अर्जदार ही गर्भवती असताना गैरअर्जदार हा तिची काळजी घेत नव्हता. अर्जदार हिने एका मुलीला जन्म दिला परंतु गैरअर्जदार हा तिची व तिच्या मुलीची काळजी घेत नव्हता. अर्जदाराच्या संपूर्ण प्रसुतीचा खर्च हा अर्जदार हिच्या आईवडीलांनी केला.

**०३.** अर्जदार ही दिनांक २२.०५.२०१९ पासून गैरअर्जदारापासून वेगळी तिच्या माहेरी राहत आहे. तेव्हा पासून गैरअर्जदार याने अर्जदार हिला फोन केला नाही तसेच

मुलीबाबत देखील विचारपूस केली नाही. तसचे कोणत्याही जिवानवश्यक वस्तु पुरविलेल्या नाहीत. तसेच अर्जदार हिच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. त्यामुळे अर्जदार हिला तिच्या वडीलांवर अवलंबून राहावे लागत आहे. अर्जदार ही तिच्या आईवडीलांकडे तिचे जिवन जगत आहे. तसेच गैरअर्जदार याला शेती तसेच खाजगी नोकरी करून दरमहा २५,०००/– ते ३०,०००/– रुपये इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी फौ.प्र.स. कलम १२५ नुसार गैरअर्जदार यांच्याकडून उदरनिर्वाहाकरीता अंतरिम पोटगी रक्कम रुपये ११,०००/– ची मागणी केलेली आहे.

**०४.** गैरअर्जदार यांनी नि.क्र.१० खाली त्याचे म्हणणे दाखल केलेले आहे व अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. अर्जदार सोबतचे नाते गैरअर्जदार यांनी कबुल केले आहे. गैरअर्जदारने पुढे असे कथन केले आहे की अर्जदार ही गैरअर्जदार याचा अपमान करीत होती. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार याला नेहमी वेगळे राहण्यास म्हणत होती. तसेच अर्जदार व गैरअजदार हे वेगळे राहून देखील अर्जदार हिच्या वागणुकीत कोणताही बदल नव्हता. दिनांक ०३.१०.२०१८ रोजी अर्जदार ही गैरअर्जदाराची कोणतीही परवानगी न घेता त्याला न सांगता तिच्या माहेरी सोन्याचे दागिने घेवून निघून गेली. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदाराविरुध्द दिनांक ०३.१०.२०१८ रोजी पोलीस स्टेशन मानकापूर येथे कलम ५०६ भादवी खाली एनसीआर क्र. ८४४/२०१८ दाखल केली. गैरअर्जदार याला ऑगस्ट २०१९ पासून पैरालिसिसच्या आजार झाल्यामुळे तो चालू फिरू शकत नाही. तो कोणतेही काम करू शकत नाही. तसेच तो त्याच्या परिवारावर अवलंबून आहे. अर्जदार ही शिक्षीत आहे तसेच ती कंपनीत खाजगी नोकरी करून दरमहा १०,०००/– इतके उत्पन्न कमविते. तसेच अर्जदार हिला पार्लर तसेच टेलरिंगचे ज्ञान आहे. तसेच ती तिच्या आईवडीलांच्या घरी काम करून दरमहा १०,०००/– इतके उत्पन्न कमविते. तसेच नुकतेस अर्जदार हिने संदीप भोटे यांच्याशी दुसरा विवाह केलेला आहे. त्यामुळे अर्जदार हिला कोणत्याही पोटगीची आवश्यकता

नाही. त्यामुळे गैरअर्जदाराने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०५.** अर्जदार व गैरअर्जदार तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. गैरअर्जदार यांनी कबुल केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ व २ हे त्याची पत्नी व मुलगी आहे. अर्जदार ही तिचा मुलीला घेवून तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार क्र.१ व २ हे गैरअर्जदाराची पत्नी व मुलगी असल्यामुळे त्याचा सांभाळ करण्याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदार यांची आहे. अर्जदार हिने दुसरा विवाह केला आहे किंवा नाही हे पुराव्यानंतर शाबीत होईल. अर्जदार व गैरअर्जदार यांच्यातील नाते लक्षात घेता, अर्जदार या गैरअर्जदार कडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

**०६.** अर्जदारानी गैरअर्जदार कडून रक्कम रुपये ११,०००/– अंतरिम पोटगी म्हणून मागणी केली आहे. अर्जदारांच्या कथनानुसार गैरअर्जदार शेती तसेच खाजगी नोकरी करून दरमहा २५,०००/– ते ३०,०००/– इतके उत्पन्न कमवित आहेत. परंतु गैरअर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा अर्जदार यांनी दाखल केलेला नाही. अश्या परिस्थितीत सद्यः स्थितीच्या महागाईच्या दराचा विचार करता अर्जदार यांना गैरअर्जदार कडून रक्कम रुपये ३,०००/– प्रति महिना अंतरीम पोटगी मंजूर करणे योग्य होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

## <u>आ दे श</u>

१. गैरअर्जदार यास असे आदेशित करण्यात येते की त्यांनी अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणून रक्कम रुपये ३,०००/–(फक्त तीन हजार रुपये) अर्ज दाखल केल्यापासुन ते मूळ अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत द्यावेत.

(*आदेश खुल्या न्यायालयात जाहिर*)

SAGAR SHAM JADHAV
Digitally signed by SAGAR SHAM JADHAV
Date: 2024.06.18 17:41:22 +0530

**दिनांक – १८/०६/२०२४**

**( सागर एस. जाधव )**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र. २, कामठी**